सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ९६ | शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



श्री. रवींद्र वासुदेव माळी
प्रताप कॉलेज, अमळनेर

## दै. ग्लोबल महातेजच्या बातमीचा दणका

# अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभाराबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांनी अधिकाऱ्यांना धरले धारेवर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर : येथील ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभाराबाबत दै. ग्लोबल महातेजने मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर, शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर व मंगळवार, दि. १६ डिसेंबर रोजी ठळक बातम्या प्रसिद्ध करून वाचा फोडली होती. या बातम्यांची दखल घेऊन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. स्वप्निल सांगळे यांनी शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी दुपारी अचानक भेट दिली. अधिकारी व कर्मचाऱ्यांची झाडाझडती घेऊन त्यांना चांगलेच धारेवर धरले आहे.**

डॉ. सांगळे यांनी स्वच्छता, निर्जंतुकीकरण तसेच रंगनिहाय बेडशीट्सच्या वापराबाबतची पाहणी केली. भोंगळ कारभार सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा दिला. त्यांना रुग्णालयातील विविध वॉर्डमधील भिंती, खिडक्या तसेच जिन्यांच्या परिसरात थुंकीचे डाग सर्वत्र आढळून आले. रुग्णालय परिसरात या प्रकारांना बंदी असतानाही नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे त्यांना निदर्शनास आले. यामुळे संसर्गजन्य आजार पसरण्याचा धोका वाढत असून, स्वच्छता कर्मचाऱ्यांसह रुग्णालय प्रशासनाचीही मोठी हलगर्जीपणा उघडकीस आला आहे. याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली.

रुग्णालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. त्यानंतर तातडीने साफसफाईला कर्मचारी कामाला लागले. संबंधित ठिकाणी त्वरित स्वच्छता करण्याचे व दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले.

यावेळी डॉ. सांगळे यांनी सांगितले, की जिल्ह्याची आरोग्यसेवेची परिस्थिती एकंदरीत समाधानकारक आहे. मात्र काही बाबींमध्ये अडचणी आहेत. त्यांचा आढावा घेण्यासाठी मी आज भेट दिली आहे. स्वच्छता, सुरक्षा तसेच मनुष्यबळाबाबतही काही प्रमाणात कमतरता आहे. विशेषतः स्वच्छतेचा प्रश्न गंभीर आहे. याबाबत अधिकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना तत्काळ सूचना केल्या आहेत. पुढील भेटीत स्वच्छता अधिक चांगल्या पद्धतीने राखली जाईल. तसेच रुग्णांना सर्व सुविधा उत्कृष्ट स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येतील, असे आश्वासन संबंधितांकडून देण्यात आले आहे. रुग्णसेवा सुधारण्याच्या प्रक्रियेत कोणीही जाणीवपूर्वक अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास, त्यांच्यावर आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. गुणवत्तापूर्ण व उत्कृष्ट रुग्णसेवा देणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. रुग्णालयाच्या इमारतीचे संपूर्ण सुशोभीकरण, रंगरंगोटी, गळती (लिकेज), तुटलेल्या अथवा फुटलेल्या काचा तसेच पाण्याच्या समस्यांसारखे सर्व प्रश्न येत्या डीपीडीसी योजनेअंतर्गत निधी मिळवून पालकमंत्र्यांशी समन्वय साधून मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात येईल. १०८ रुग्णवाहिका सेवा लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याबाबत आढावा बैठक घेण्यात येणार आहे. ड्रायव्हर, डिझेल, वाहन फिटनेस आदी संदर्भातील अडचणी असल्यास त्यांचे तातडीने निराकरण करण्यात येईल. साप व कुत्रा चावल्यावरील औषधे रुग्णालयात सध्या मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. हा साठा संपण्याच्या किमान पंधरा दिवस आधीच मागणी नोंदवून पुरवठा सुनिश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे या संदर्भात कोणतीही अडचण येण्याची शक्यता नाही. अमळगाव रुग्णालयास भेट देण्यामागील उद्देश तेथील स्थानिक परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करणे हा होता. कोणत्याही कर्मचाऱ्याला मनमानी पद्धतीने सूट दिली जाणार नाही. सर्व कर्मचारी नियमांचे काटेकोर पालन करून रुग्णसेवेसाठी बांधील राहतील, असेही डॉ. सांगळे यांनी सांगितले.









ग्लोबल महातेज
16 Dec 2025 - Page 1

रंगीत बेडशीटस्च्या आदेशाला केराची टोपली..!

अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभार चव्हाट्यावर...!!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

कुठल्या दिवशी कोणता रंग ?
सोमवार व गुरुवार - पांढरा
मंगळवार व शुक्रवार - गुलाबी
बुधवार, शनिवार व रविवार - हिरवा

## दिनविशेष
२७ डिसेंबर

- आंतरराष्ट्रीय साथीचे रोग तयारी दिन
- "जन गण मन", भारताचे राष्ट्रगीत, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात प्रथम गायले गेले.
- पंजाबराव देशमुख विदर्भातील सामाजिक नेते, शिक्षण प्रसारक आणि केंद्रीय कृषिमंत्री यांचा जन्म.
- नित्यानंद स्वामी उत्तराखंडचे पहिले मुख्यमंत्री यांचा जन्म.
- सलमान खान हिंदी चित्रपट अभिनेता यांचा जन्म.
- मालती पांडे-बर्वे मराठी भावगीत गायिका यांचे निधन.
- देवदत्त नारायण टिळक मराठी साहित्यिक, ज्ञानोदयचे संपादक यांचे निधन.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

सेल्फ स्टडीच्या जोरावर यूपीएससी क्रॅक
पान २ वर

गुरु गोविंदसिंहजी जयंती : धर्म, धैर्य आणि मानवतेचा अमर संदेश
पान ४ वर

# शिवसेनेसह अपक्षांच्या गटाचे २२ नगरसेवक एकसंघच!

## शिरीषदादा चौधरी; १ जानेवारीला डॉ. बाविस्करांचा होणार पदग्रहण सोहळा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील पालिका निवडणुकीनंतर शहरात घोडेबाजार व फूट पडणार अशा चर्चा सुरू होत्या. मात्र, आमचे २२ नगरसेवक कुठल्याही आमिषाला बळी न पडता एकसंघच राहिले. शहराचा सर्वांगीण विकास हाच आमचा एकमेव अजेंडा आहे. सर्वांना न्याय देण्याचा आमचा प्रयत्न राहील. गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६ रोजी डॉ. परीक्षित बाविस्कर लोकनियुक्त नगराध्यक्षपदाचा नागरिकांच्या साक्षीने पदभार स्वीकारतील, अशी माहिती माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांनी दिली.

पान ३ वर

### यांची होती उपस्थिती....

यावेळी ज्येष्ठ नेत्या अॅड. सौ. ललितताई पाटील, शिवसेनेचे पालिकेतील गटनेते पंकज चौधरी, अपक्षांच्या गटाचे गटनेते महेश देशमुख, रवींद्र पाटील, सुरज परदेशी आदींसह शिवसेनेचे नूतन नगरसेवक, अपक्ष गटाचे सहा नगरसेवकांसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पडदे के पिछे क्या है...?

खासदार स्मितताई वाघ, भाजपचे कार्यकर्ते तसेच माजी आमदार कृषीभूषण साहेबरावदादा पाटील यांनी पडद्यामागून मदत केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. त्यामुळे अनेक नगरसेवकांसह नगराध्यक्षपदी डॉ. बाविस्करही विजयी झाल्याचे समाधान आहे, असा गौप्यस्फोटही श्री. चौधरी यांनी केला. श्री. चौधरी यांच्या या वक्तव्यामुळे 'पडदे की पिछे क्या है...?' याबाबत आता चर्चेला उधाण आले आहे.



"अमळनेरकरांच्या इच्छाशक्तीमुळेच मी विजयी झालो आहे. निवडणूक निकालाच्या आदल्या रात्रीच विरोधकांनी निवडीचे बॅनर लावले होते. मात्र, आम्ही तसे न करता निवडणुकीचा निकाल लागताच प्रत्यक्ष कामांना सुरूवात केली आहे. अमळनेरकरांसाठी माझा एक- एक मिनिट समर्पित राहील. स्वच्छता, आरोग्य सेवा तसेच महिला रोजगारावर विशेष भर दिला जाईल. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. येत्या पाच वर्षांत शहराचा नक्कीच कायापालट होईल.

**- डॉ. परीक्षित बाविस्कर,**
लोकनियुक्त नगराध्यक्ष, अमळनेर.

### २४ तास पाणी मिळेल

२४ तास पाणीपुरवठा योजना माझ्या आमदारकीच्या काळात सुरू झाली होती. मात्र, गेल्या पाच वर्षांत तिचा पाठपुरावा झाला नाही. सदर योजना आम्हीच सुरू केली असून, पूर्णत्वासही आम्हीच नेऊ. मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या माध्यमातून निधीची कमतरता भासणार नाही. पालिकेवरील कर्जाचा भारही निश्चितच कमी होईल. नंदुरबार व अमळनेर मिळून ४५ नगरसेवक शिवसेनेच्या चिन्हावर निवडून आले आहेत.

## खानदेश शिक्षण मंडळाची निवडणूक

# जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा

### निवडणूक उपसमितीचे आवाहन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील शिक्षण मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुकीसाठी रविवार, दि. ४ जानेवारी प्रताप महाविद्यालयात सकाळी आठ ते सायंकाळी पाच मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यासाठी १० बुथची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदारांनी जास्तीत जास्त मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी पंडित चौधरी व खा. शि. मंडळाचे चिटणीस प्रा. पराग पाटील यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

याबाबत त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात म्हटले आहे, की मतदानास येणाऱ्या मतदार सभासदाने सोबत फोटो ओळखपत्र (मूळ आधार कार्ड व एक प्रत झेरॉक्स) आणावा. तसेच ज्या सभासदांनी फोटो व आधार कार्डच्या झेरॉक्ससह संस्थेच्या कार्यालयात फॉर्म जमा केलेले नाही, अशा सभासदांनी एक पासपोर्ट साईज फोटो आणणे अनिवार्य आहे. ओळखीसाठी शासन मान्यता प्राप्त असलेले ओळखपत्र (आधार कार्ड/ मतदान कार्ड/ पॅन कार्ड आदी) आणावे. अध्यक्षपदासाठी १, विश्वस्तपदासाठी १ व उपाध्यक्षपदासाठी २ मते देण्याचा अधिकार आहे. त्यापेक्षा जास्त मते दिल्यास मतपत्रिका बाद होईल. कार्यकारी मंडळ सदस्य पदासाठी ८ मते देण्याचा अधिकार आहे. त्यापेक्षा अधिक मते दिल्यास मतपत्रिका बाद होईल. मतदान झाल्यावर मतदारास सायकल स्टॅण्डच्या बाजुच्या रस्त्याने किंवा प्रताप हॉस्पिटलच्या समोरील प्रवेशद्वारातून बाहेर जाण्याचा मार्ग राहील.











# सेल्फ स्टडीच्या जोरावर यूपीएससी क्रॅक

## २३ वर्षीय कस्तुरी पांडा बनल्या आयएएस अधिकारी



### सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यूपीएससी ही देशातील सर्वांत कठीण परीक्षा मानली जाते. ज्यात लाखो उमेदवार कोचिंग इन्स्टिट्यूट्सच्या लाखो रुपये खर्च करतात. मात्र, ओडिशाच्या कस्तुरी पांडा यांनी दाखवून दिले, की पक्का इरादा आणि सेल्फ स्टडीनेही हे शक्य आहे. वयाच्या अवघ्या २३ वर्षी त्यांनी यूपीएससी सिव्हिल सर्व्हिसेस परीक्षा २०२३ मध्ये ऑल इंडिया रँक ६७ मिळविली आणि आयएएस अधिकारी बनल्या. कोणत्याही कोचिंगशिवाय घरी अभ्यास करून मिळवलेले हे यश लाखो तरुणांसाठी प्रेरणा आहे.

**कस्तुरी पांडा यांची पार्श्वभूमी आणि तयारी**

कस्तुरी पांडा या ओडिशाच्या रहिवाशी आहेत. त्यांनी एनआयटी राउरकेला येथून कॉम्प्युटर सायन्समध्ये बी.टेक पूर्ण केले. शिक्षणादरम्यानच त्यांना सिव्हिल सर्व्हिसेसची प्रेरणा मिळाली. पदवी पूर्ण केल्यानंतर त्यांनी पूर्णवेळ यूपीएससी तयारीला सुरूवात केली. त्यांच्या कुटुंबाने विशेषतः पालकांनी प्रत्येक टप्प्यावर प्रोत्साहन दिले. ज्यामुळे त्यांना आत्मविश्वास मिळाला.

**पहिला प्रयत्न :** २०२२ मध्ये त्यांनी ओडिशा पब्लिक सर्व्हिस कमिशन परीक्षा उत्तीर्ण केली. पीसीएस अधिकारी म्हणून १४ वी रँक मिळवली (वय २२ वर्षे). यूपीएससीच्या पहिल्या प्रयत्नात त्या इंटरव्ह्यूपर्यंत पोहोचल्या.

**अंतिम यादीत नाव आले नाही.**

**दुसरा प्रयत्न आणि यश :** हार न मानता चुकांमधून शिकून त्यांनी दुसऱ्या प्रयत्नात १००६ गुण मिळविले (**लेखी :** ८२२, **इंटरव्ह्यू :** १८४). यामुळे एआयआर ६७ मिळाले. हे यश सेल्फ स्टडीचे उदाहरण आहे एनसीईआरटी पुस्तके, लक्ष्मीकांत (राज्यशास्त्र), स्पेक्ट्रम (इतिहास) आणि शंकर आयएएस (पर्यावरण) सारख्या पुस्तकांवर आधारित. कस्तुरी म्हणतात, की कोचिंगशिवायही यश मिळू शकते. फक्त सातत्य आणि स्मार्ट स्टडी आवश्यक आहे. मी दररोज वर्तमानपत्र वाचले. नोट्स काढल्या आणि मॉक टेस्ट दिल्या.

**यूपीएससीसाठी आवश्यक पात्रता**

यूपीएससी सिव्हिल सर्व्हिसेस परीक्षा देण्यासाठी –

**शैक्षणिक :** मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेतील पदवी (कोणतीही विशिष्ट टक्केवारी नाही). १२ वीचे गुण महत्त्वाचे नाहीत.

वय : २१ ते ३२ वर्षे (आरक्षित वर्गांसाठी सवलत).

प्रयत्न : सामान्य वर्ग : ६, ओबीसी : ९, एस.सी./एस.टी. : अमर्यादित (वय मर्यादापर्यंत).

विना कोचिंग यूपीएससी तयारी कशी करावी? कस्तुरीच्या टिप्स

**१) पाया मजबूत करा :** एनसीईआरटी पुस्तके (६ वी ते १२ वी) वाचा इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्रासाठी. हे बेसिक क्लिअर करतात.

**२) प्रमाणित पुस्तके :**
राज्यशास्त्र : एम. लक्ष्मीकांत.
इतिहास : स्पेक्ट्रम (राजीव अहिर).
पर्यावरण : शंकर IAS.
अर्थशास्त्र : रमेश सिंग.
भूगोल : जीसी लियोंग.

**३) वर्तमान घडामोडी :** द हिंदू किंवा इंडियन एक्सप्रेस रोज वाचा. मासिक मासिक (योजना, कुरुक्षेत्र) फॉलो करा.

**४) नोट्स आणि उजळणी :** स्वतः नोट्स काढा, साप्ताहिक रिव्हिजन करा.

**५) मॉक टेस्ट :** व्हीजन आयएएस किंवा इनसाइट्सच्या ऑनलाइन टेस्ट सीरिज द्या. सीएसएटीसाठी सराव.

**६) इंटरव्ह्यू तयारी :** डिटेल ॲप्लिकेशन फॉर्म भरताना हॉबी आणि ओडिशा पार्श्वभूमीवर फोकस.

**७) वेळापत्रक :** रोज ८–१० तास अभ्यास, ब्रेक घ्या. कुटुंबाच्या सपोर्टने सतत प्रेरणा मिळवा.

कस्तुरी यांचे यश दाखवते, की कोचिंग ऐच्छिक आहे. मेहनत आणि स्ट्रॅटेजी महत्त्वाची. जर तुम्ही यूपीएससीचे स्वप्न पाहत असाल, तर आजपासून सुरूवात करा.

# चौदा वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने क्रिकेट इतिहासात कुणाला जमले नाही ‘ तो ’ विक्रम करून दाखविला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैभव सूर्यवंशी याने यंदाच्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये धमाकेदार कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. १४ वर्षांच्या वैभवने बुधवार, दि. २४ डिसेंबर रोजी झालेल्या बिहारच्या हंगामातील पहिल्याच प्लेट ग्रुप सामन्यात देशांतर्गत क्रिकेटमधील आतापर्यंत सर्वांत धडाकेबाज खेळी केली.सूर्यवंशीने अरुणाचल प्रदेश विरुद्ध ८४ चेंडूंत १९० धावांची धमाकेदार खेळी केली. त्याने साकिबुल गनी सोबत सलामी दिली होती. या जोडीने अरुणाचल प्रदेशच्या गोलंदाजांवर निर्विवाद वर्चस्व गाजवले. या खेळीत सूर्यवंशीने १६ चौकार आणि १५ षटकार मारले. त्याचे वय पाहता ही खेळी वाखाणण्याजोगी होती.

**जबरदस्त वर्ल्ड रेकॉर्ड**

वैभव सूर्यवंशीने या विक्रमी खेळीसोबतच एक जबरदस्त वर्ल्ड रेकॉर्ड केले. लिस्ट ए आणि टी क्रिकेटमध्ये १५ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी शतक ठोकणारा तो क्रिकेट इतिहासातील पहिला पुरुष क्रिकेटपटू ठरला आहे. समस्तीपूरचा राहणारा वैभव हा यापूर्वी आयपीएल आणी टी २० क्रिकेटमध्ये शतक ठोकणारा सर्वांत तरुण खेळाडू ठरला होता. बुधवारी त्याने आपल्या विक्रमांच्या लीस्टमध्ये आणखी एक विश्वविक्रम समाविष्ट केला आहे.

**पाकिस्तानच्या जहूरचा विक्रम मोडला**

वैभव सूर्यवंशीचे १४ वर्षे अन् २७२ दिवस इतके वय आहे. वैभव सूर्यवंशी हा लीस्ट ए मध्ये शतक ठोकणारा सर्वांत तरुण पुरुष क्रिकेटपटू ठरला आहे. त्याने पाकिस्तानच्या जहूर इलाही यांचा अनेक दिवसांपासून अबाधित असलेला विक्रम मोडला. जहूर यांनी १५ वर्षे २०९ दिवस इतके वय असताना १०३ धावांची नाबाद खेळी केली होती. त्यांनी ही खेळी १९८६ ला केली होती. विशेष म्हणजे सूर्यवंशीने अरुणाचल प्रदेश विरुद्ध ३६ चेंडूंत शतक ठोकले होते.

**डिव्हिलियर्सचा विक्रम मोडला**

मात्र त्या दिवशी शाकिबुल गनीने ३२ चेंडूंत तर इशान किशनने ३३ चेंडूंत शतक ठोकले. असे असले तरी वैभव शतकानंतर शांत बसला नाही. त्याने ५९ चेंडूंत १५० धावांची खेळी केली अन् अजून एक रेकॉर्ड ब्रेक केले. त्याने एबी डिव्हिलियर्सचे लीस्ट ए मधील सामन्यात सर्वांत वेगवान १५० धावा ठोकण्याचा विक्रम मोडला. डिव्हिलियर्सने २०१५ ला वन–डे वर्ल्डकपमध्ये ६४ चेंडूंत दीडशतक ठोकले होते.

बिहारने अरुणाचल प्रदेश विरुद्धच्या वन–डे सामन्यात तब्बल ५७४ धावांचा महापर्वत उभारला होता. त्यात वैभव सूर्यवंशीच्या १९० धावांचे मोठे योगदान होते.



# स्त्रियांमधील लठ्ठपणा : त्याची कारणे, त्यामुळे होऊ शकणारे आजार व लठ्ठपणावर निसर्गोपचार



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्त्रियांच्या शरीरात अतिलठ्ठपणा (ओव्हरवेट) झाल्यास त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अशावेळी योग्य निसर्गोपचार पद्धती अवलंबल्या तर सकारात्मक परिणाम मिळतात. अन्यथा विविध गंभीर आजार होऊ शकतात. अतिलठ्ठपणा ही समस्या दिवसेंदिवस महिलांमध्ये प्रामुख्याने दिसून येते. बदललेली आहारपद्धती, जीवनशैली आणि ताणतणाव यामुळे शरीरावर विपरीत परिणाम होतात. ही समस्या लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना भेडसावते. परंतु पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये अधिक प्रमाणात आढळते. अनेक स्त्रिया आणि मुली या समस्येने त्रस्त असतात. घरगुती उपाय करूनही अपेक्षित फरक न पडल्यास नेमके कारण आणि उपाय समजून घेणे आवश्यक आहे.

**अतिलठ्ठपणाची कारणे :**
- अनुवंशिकता
- अनियमित आहारपद्धती
- प्रसूतीनंतर वजन वाढणे
- एखादी वैद्यकीय उपचार पद्धती (ट्रीटमेंट) चालू असणे
- हार्मोनल असंतुलन
- टाइप २ डायबिटीज
- हाय कोलेस्ट्रॉल

**अतिलठ्ठपणामुळे होऊ शकणारे आजार :**
- हाय ब्लड प्रेशर
- डायबिटीज
- मणक्यात आणि गुडघ्यात अंतर (गॅप) येणे
- हाडांचे विविध आजार
- हार्ट अटॅक
- पॅरालिसिस किंवा व्हर्टिगो (चक्कर येणे)
- इनफर्टिलिटी (वंध्यत्व)
- पीसीओडी
- पीसीओएस
- त्वचेवर फंगल इन्फेक्शन
- स्ट्रेच मार्क्स दिसणे

**अतिलठ्ठपणावर निसर्गोपचार पद्धती :**

अतिलठ्ठपणावर गेल्या अनेक वर्षांपासून विविध निसर्गोपचार पद्धती अवलंबल्या जातात. यात वजन कमी करण्यासाठी नैसर्गिक अर्क वापरले जातात. ज्यांचे रुग्णांवर दुष्परिणाम होत नाहीत. नॅचरोपॅथीमध्ये व्यक्तीचा सर्वांगीण विचार करून उपचार दिले जातात. निसर्गोपचाराबरोबर योग्य आहार, व्यायाम आणि योगासान अभ्यास केल्यास उत्तम फायदा होतो.

# सणासुदीला जेवणासाठी आणलेले पनीर अस्सल की भेसळयुक्त? कसे ओळखाल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सणासुदीच्या दिवसांमध्ये घराघरांमध्ये चमचमीत पदार्थ बनतात. त्यात पनीरला मानाचे स्थान मिळते. मात्र यामध्ये होणारी भेसळ विसरून चालणार नाही. भेसळयुक्त पनीर सर्रास बाजारात मिळते आणि त्याला अनालॉग पनीर म्हणूनही ओळखले जाते. बनावट पनीर घरच्या घरीसुद्धा सोप्या चाचण्यांनी ओळखता येते. खाली काही सोप्या पद्धती सांगितल्या आहेत.

**१) बोटांनी चिरडून पाहण्याची चाचणी :**

एक लहानसा तुकडा पनीर बोटांनी चिरडून पाहा. अस्सल पनीर नरम, मऊसूत आणि सहज तुटणारा असतो. भेसळयुक्त पनीर हातांना खवखवदार किंवा खोडरसारखा भासतो.



**२) फायर टेस्ट (आगीची चाचणी) :**

पनीरचा लहानसा तुकडा गॅसवर मंद आचेवर (थेट आचेवर) ठेवा. अस्सल पनीर लगेच वितळते, पाणी सोडते आणि त्यातून दुधासारखा गंध येतो. भेसळयुक्त पनीरमधून केरोसीनसारखी दुर्गंधी येते.

**३) पॅन हीट टेस्ट (कढईत गरम करण्याची चाचणी) :**

एका कोरड्या पॅनमध्ये तेल किंवा पाण्याशिवाय पनीरचा तुकडा गरम करा. अस्सल पनीर सहज पाणी सोडते, काहीसे आकुंचन पावते, पिवळसर पडते. मात्र त्याचा आकार कायम राहतो. भेसळयुक्त पनीर गरम केल्यास तुटण्यास सुरूवात होते, करपतो आणि वितळत नाही.

**४) आयोडिन टेस्ट (आयोडिन चाचणी) :**

मेडिकल स्टोअरमध्ये मिळणाऱ्या आयोडिन टिंचरच्या २–३ थेंबांना पनीरवर टाका. अस्सल पनीरचा रंग बदलत नाही. भेसळयुक्त पनीरमध्ये स्टार्च असल्यास तो निळा किंवा काळा पडतो. (लक्षात घ्या : ही चाचणी स्टार्चची भेसळ ओळखते.)

**५) लिंबाचा रस टाकून चाचणी :**

पनीरवर लिंबाचा रस टाका. अस्सल पनीर फक्त आंबट होते. भेसळयुक्त पनीर आकुंचन पावतो किंवा विकृत होतो.

**सल्ला :** नेहमी विश्वासू दुकानातून पनीर खरेदी करा. शक्य असल्यास घरीच बनवा. भेसळयुक्त पनीर आरोग्यास हानिकारक ठरू शकते म्हणून सावध राहा.

# वेळ वाचविणारा चमत्कारीक शोध...! कपातील चहा संपेपर्यंत गाडीची बॅटरी होणार चार्ज...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इलेक्ट्रिक कारचा बाजार सध्या चांगला वाढला आहे. मात्र अजूनही काही लोक इलेक्ट्रिक गाडी चार्ज करण्यासाठी लागणाऱ्या वेळावरून इच्छा असूनही इलेक्ट्रिक गाडी घेण्यापासून पाय मागे खेचत आहेत. परंतु आता अशा लोकांसाठी एक आनंदाची बातमी आहे.

चार्जिंगला लागणारा प्रचंड वेळ या समस्येवर ‘ बीवायडी ’ने या समस्येवर तोडगा काढला आहे. चीनच्या कार निर्मिती कंपनी ‘ बीवायडी ’ने नवीन फ्लॅश चार्जिंग टेक्नॉलॉजी आणली असून, चार्जिंगच्या बाबतीत त्यांनी पेट्रोलपंपावर पेट्रोल भरण्यासाठी लागणाऱ्या वेळेला देखील आव्हान दिले आहे. कंपनीचा दावा आहे की नव्या फ्लॅश चार्जिंग तंत्रज्ञानामुळे एक इलेक्ट्रिक गाडी फक्त ५ मिनिटांत चार्ज होणार आहे. तसेच एका चार्जमध्ये जवळपास ४०० किलोमीटर रेंज मिळणार आहे.

## ५ मिनिटांत थेट ४०० किलोमीटरची रेंज



**रिअल वर्ल्ड डेमो**

बिल्ड युअर ड्रीम अर्थात ‘ बीवायडी ’ने नवीन टेक्नॉलॉजीचा एक रिअल वर्ल्ड व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. यात गाडी अत्यंत कमी काळात चार्ज होत आहे. त्यामुळे हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. या व्हिडिओत ‘ बीवायडी ’च्या फ्लॅगशिप सीदान एचएएन एल चार्ज होताना दाखविण्यात आली आहे. या क्लिपमध्ये ५ मिनिटांत १० टक्क्यांवरून थेट ७० टक्क्यांपर्यंत चार्ज होताना दाखविण्यात आली आहे. या चार्जिंगवेळी चार्जिंग पॉवर ही ७४६ किलोवॉटपर्यंत पोहते. ईव्ही स्टँडर्डपेक्षा हे खूपच जास्त आहे. म्हणजे जेवढ्या वेळात तुम्हा तुमचा चहा पिता तेवढ्या वेळेत तुमची गाडी चार्ज होत आहे.

**सुपर ई प्लॅटफॉर्म**

या आश्चर्यकारक घटनेच्या मागे ‘ बीवायडी ’चा नवा सुपर ई प्लॅटफॉर्म आहे. हा पॅसेंजर व्हेईकलच्या जगातील पहिला मास प्रोड्यूस फूल डोमेन १००० व्ही हाय व्होल्टेज आर्किट्रेक्चर आहे. या प्लॅटफॉर्मसोबत कंपनीची नवी फ्लॅश चार्जिंग बॅटरी काम करत आहे. यात १००० ॲम्पियरपर्यंत चार्जिंग करंट आणि १० सी चार्जिंग रेटसारखे रेकॉर्ड सेट करत आहे.

**१ मेगावॉट चार्जिंग पॉवर**

सुपर ई–प्लॅटफॉर्म आणि फ्लॅश चार्जिंग बॅटरीचे हे कॉम्बिनेशन मिळून १ मेगावॉट म्हणजे १००० किलोवॉटपर्यंतची चार्जिंग पॉवर देण्यास सक्षम आहे. याचा थेट फायदा हा या टेक्नॉलॉजीने युक्त असलेल्या इलेक्ट्रिक गाड्यांना होणार आहे. या गाड्या फक्त ५ मिनिटांत जवळपास ४०० किलोमीटरची सीएलटीसी ड्रायव्हिंग रेंज देऊ शकते. ‘ बीवायडी ’चे म्हणणे आहे, की त्यांनी अल्ट्रा पॉवर चार्जिंगसाठी लागणारी नेक्स्ट जनरेशन ऑटोमेटिव्ह ग्रेड एसआयसी पॉवर चीप स्वतः डेव्हलप केली आहे. याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन देखील सुरू झाले आहे. या चीपचे व्होल्टेज रेटिंग १५०० व्ही पर्यंत आहे. यामुळे ही इंडस्ट्रीचा पहिला मास प्रोड्युसर ऑटोमेटिव्ह ग्रेड एसआयसी पॉवर चीप बनते. याची व्होल्टेज क्षमता सर्वाधिक मानली जात आहे.

**चार्जिंग एन्झायटी संपविण्याचे लक्ष्य**

‘ बीवायडी ’चे सीईओ यांच्या मते कंपनीचा चार्जिंग एन्झायटीला पूर्णपणे संपविणे हा उद्देश आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार चार्जिंगला लागणाऱ्या वेळाची भीती ही आजही ईव्ही खरेदी करण्यामध्ये मोठी बाधा निर्माण करत आहे. हाच विचार घेऊन एचएएन एल सीदान आणि टीएएनजी एल एसयुव्हीसारखे मॉडेल्स या नव्या प्लॅटफॉर्मवर लाँच करण्यात आल्या आहेत.

**चीनच्या बाहेरही मोठी तयारी**

‘ बीवायडी ’ची योजना फक्त चीनपुरतीच मर्यादित नाही. कंपनीने या फ्लॅश चार्जिंग सिस्टिमला युरोप आणि अन्य विदेशी मार्केटमध्ये देखील घेऊन जाण्याच्या तयारीत आहे. विशेष म्हणजे या मार्केटमध्ये हळूहळू १००० वॅट चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर तयार होत आहे. जर हे तंत्रज्ञान जगभरात पसरले तर इलेक्ट्रिक कारचे भविष्य पहिल्यापेक्षा अधिक वेगाने उज्ज्वल होईल.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com

## अमळनेरला आज सहा तास वीजपुरवठा राहणार खंडित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील महावितरण कंपनीच्या १३२ केव्ही उपकेंद्रातील तातडीच्या मेंटेनेन्स कामाकरिता शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत शहरासह तालुक्यातील वीजपुरवठा खंडित राहणार आहे. वीज ग्राहकांनी याची नोंद घ्यावी. आपापल्या कामाचे नियोजन करावे. कंपनीस सहकार्य करावे, असे आवाहन महावितरण कंपनीचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी केले आहे.

# ‘काळी माती’च्या माध्यमातून विश्वात दरवळतोय अमळनेरच्या मातीचा सुगंध...!

## अमळनेरचे सुपुत्र डॉ. हेमंतकुमार महाले यांचा चित्रपट आज अमळनेरात होतोय प्रदर्शित...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : अमळनेरचे सुपुत्र व हेमंतकुमार म्युझिकल्स या यू ट्युब चॅनलच्या माध्यमातून संगीतविश्वात ज्यांचे लाखो फॉओअर्स व कोट्यवधी व्हिवरशिप आहे असे डॉ. हेमंतकुमार महाले यांनी निर्माता व दिग्दर्शकाच्या भुमिकेतून साकार केलेला ‘काळी माती’ हा पहिलाच चित्रपट शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी अमळनेर येथील ‘एसएस मल्टिप्लेक्स’ येथे सकाळी साडे नऊ वाजता प्रदर्शित होत आहे. अमळनेरसह राज्यात विविध ठिकाणीही ‘काळी माती’ हा चित्रपट झळकणार आहे. डॉ. हेमंतकुमार महाले यांचे अकरावीपर्यंतचे शिक्षण येथील जी. एस. हायस्कूलमध्ये, तर बी.ए. पर्यंतचे शिक्षण येथील प्रताप महाविद्यालयात झाले आहे. येथील मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांचे ते ज्येष्ठ बंधू आहेत.

सदर चित्रपटाला एका वर्षात ४४४ सर्वोत्तम राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यास इंडिया




बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्सने मान्यता दिली आहे. आता सदर चित्रपटासाठी डॉ. श्री. महाले यांनी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डकडे अर्ज केला आहे.

विशेष म्हणजे डॉ. श्री. महाले गेल्या ५ दशकांहुनही अधिक काळापासून हेमंतकुमार ॲण्ड पार्टी व हेमंतकुमार म्युझिकल्स या शिर्षकांच्या माध्यमातून जगभरात गीत, संगीत व नृत्याचे जगभर शो करीत आहेत. त्यांच्या नावावर अनेक प्रतिष्ठीत रेकॉर्डस् आहेत. कित्येक नामवंत पारितोषिकांनी ते सन्मानित आहेत. स्वतःच्या मध्यमवर्गीय परिवाराला संगीत व चित्रपटाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना श्री. महाले यांनी सिने व संगीत क्षेत्रात मिळविलेली किर्ती अत्यंत कौतुकास्पद व या क्षेत्रातील अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. संगीत व सिने क्षेत्राचा त्यांना कोणताही अनुभव नव्हता. कोठेही रितसर प्रशिक्षण घेतलेले नव्हते. तरीही त्यांनी या क्षेत्रात केलेली प्रगती विशेष अभिमानास्पद व अभिनंदनीय ठरते. त्यांच्या म्युझिकल ग्रुपमध्ये मंगेशकर परिवारासह देशातील सर्वच्या सर्व दिग्गज गायक व वादक यांचा समावेश राहिला आहे. अनेक उभरत्या कलाकारांना त्यांनी व्यासपीठ मिळवून दिले आहे. हेच कलावंत आज डॉ. श्री. महाले यांच्या कृपाशिर्वादाने उत्तम नावलौकिक व पैसा कमवित आहेत.

सदर चित्रपट हा सत्य संघर्ष कहाणीवर आधारित आहे. ज्या शेतकऱ्याची ही गौरवगाथा आहे, त्याला उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी खास पाचारण करून त्याचा सन्मान केला आहे, हे विशेष!

अमळनेरकरांनी आपल्या लेकराचा हा चित्रपट आवर्जुन पाहावा, असे आवाहन डॉ. श्री. महाले यांनी अमळनेरकरांना विशेष विनंती करून केले आहे.

# सोशल मीडियाच्या विळख्यातून तरुणाईस मुक्त करा

## अमळनेरला काँग्रेसतर्फे प्रांताधिकारी, पोलीस प्रशासनाला निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : शहर व तालुक्यातील तरूण-तरूणींकडून सोशल मीडियाचा गैरवापर होत आहे. तरूण व्यसनाधिनतेकडे वळत आहे. राक्षसी अवैध सावकारीच्या विळख्यात अनेक तरूण अडकलेले आहेत. या पार्श्वभूमीवर तरूणाईला या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी काँग्रेसतर्फे करण्यात आली आहे. याबाबत काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी प्रांताधिकारी मयूर भंगाळे व पोलीस निरीक्षकांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की सध्याची तरुण पिढी, मुले, मुली, विद्यार्थी, कामगार हे सोशल मीडियाच्या वापराशिवाय राहू शकत नाही. त्यांना सोशल मीडियाचे व्यसन जडले आहे. तालुका व शहरातील शेतकऱ्यांची मुले, मुली, तरुण पिढीही यास अपवाद नाही. सोशल मीडियातील व्हाट्सॲप, इंस्टाग्राम, ट्विटर, फेसबूक आदींचा मोठ्या प्रमाणात मुला-मुलींकडून वापर होतो. मात्र, सोशल मीडिया मोफत, फुकट वापरता येत नाही. त्यासाठी पैसा मोजावा लागतो. त्यातही जिओ सारख्या कंपन्यांनी सुरुवातीला मोफत नंतर कमी किमतीत, त्यानंतर जास्तीची किंमत आकारून या दुःखात भर टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. शेतकरी, कामगारांची आर्थिक परिस्थिती सध्याच्या सरकारच्या आशीर्वादाने खिळखिळी झाली आहे. डबघाईला आलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची मुले- मुली सोशल मीडिया वापरण्यासाठी अवैध सावकारी धंद्याच्या माध्यमातून किंवा दबंगांकडून उधारी ने पैसे घेतात. यासाठी पैसे देणारे सावकार अव्वाच्या सव्वा व्याज आकारतात. त्यामुळे मुलांना व्याज देखील दरमहा भरणे शक्य होत नाही. दरमहा २५ ते ३० टक्के व्याज फेडण्यासाठी, पैसे परत करण्यासाठी तरूण गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळतात. नैराश्यातून नशा पाण्याच्या आहारी जातात. तसेच चोऱ्या, मारामाऱ्या करणे, अवैध धंद्यांच्या माध्यमातून पैसा मिळविण्याच्या प्रयत्न करत आहेत. नेतेही अशा तरूणांचा स्वार्थासाठी गैरवापर करतात.

अमळनेर बस स्थानक परिसरातील काही दुकानांमध्ये सायंकाळी ग्रामीण भागातील मुला- मुलींचे मोबाईल ठेवले जातात. रात्रीतून मुले ती रिचार्ज करतात व सकाळी गावावरून, खेड्यावरून आल्यानंतर संबंधित मुली दिवसभर या मोबाईलचा दुरूपयोग करतात. अशा अनेक क्लुप्त्या सध्या शहरात, तालुक्यात सुरू आहेत. या संदर्भात शासन आणि प्रशासन स्तरावरून बरबाद होणाऱ्या पिढीला वाचवण्यासाठी कडक उपाययोजना राबविण्यात याव्यात. याप्रसंगी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत सूर्यवंशी, संदीप घोरपडे, गजेंद्र साळुंखे, प्रवीण जैन, बन्सीलाल भागवत, हर्षल जाधव, संजय पवार तसेच एकलव्य सेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता, विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

**पान १ वरून**

## शिवसेनेसह अपक्षांच्या गटाचे २२ नगरसेवक एकसंघच!



शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी सायंकाळी त्यांच्या कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. श्री. चौधरी यांनी पुढे सांगितले, की पालिका निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर शहरात विविध चर्चा व तर्क-वितर्कांना उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी आम्ही ही पत्रकार परिषद घेतली आहे. निवडणुकीनंतर सर्वत्र घोडेबाजारीबाबत चर्चा होती. मात्र, तसे काहीह न होता आमचे २२ नगरसेवक एकसंघ राहिले आहेत. स्वच्छ, सुंदर आणि विकसित शहर घडविणे हीच सर्व नगरसेवकांची भूमिका आहे.

**स्वीकृत नगरसेवकांसाठी दोन गट**

एक गट १६ नगरसेवकांचा, तर दुसरा गट ६ नगरसेवकांचा आहे. या गटांचे गटनेते, उपगटनेते व प्रतोदही आम्ही नेमले आहेत. एकच गट केला असता तर आमची स्वीकृत नगरसेवकांची संख्या कमी झाली असती.

त्यामुळे सर्व घटकांना न्याय देता यावा यासाठी हा निर्णय घेतला आहे. नागरिकांच्या अपेक्षांनुसार काम व्हावे या उद्देशाने शिवसेना व अपक्ष नगरसेवकांचे दोन स्वतंत्र गट स्थापन करण्यात आले आहेत. उपनगराध्यक्षपद विरोधी गटाकडे जाईल, अशीही चर्चा होती. मात्र, सर्व पदे आमच्या दोन्ही गटांमध्येच राहतील. उपनगराध्यक्षपदाबाबत आम्ही सर्व एकत्र बसून निर्णय घेऊ. १ जानेवारीस डॉ. बाविस्कर पदभार स्वीकारतील. तेव्हा आमचे नेते पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांची उपस्थिती असतील. शहरातील व्यापारी संघटना, विविध व्यायामशाळा, समाजबांधव व नागरिकांच्या साक्षीनेच पदभार स्वीकारण्याचा सोहळा होईल. यावेळी विजयी सभेचे आयोजनही करण्यात आले आहे.

**अमळनेरच्या लेकीचा परदेशात डंका...!**

# ऑक्सफर्ड विद्यापीठातील डेटा परिषदेत वैष्णवी पाटीलचा सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : मेहनत, सातत्य आणि संधींचा योग्य वापर कसा करावा, हे येथील वैष्णवी पाटील हिने सिद्ध करून दाखविले आहे. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन तीने स्वप्न पूर्ण केले आहे. नुकताच तीने ऑक्सफर्ड विद्यापीठातील डेटा परिषदेत सहभाग घेऊन प्रबंध सादर केला आहे. अमळनेरचे नाव उज्वल केले असून, तिचा शैक्षणिक प्रवास व यश विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

वैष्णवी पाटीलने दहावीपर्यंतचे शिक्षण ग्लोबल व्ह्यू स्कूलमधून पूर्ण केले आहे. २०१८मध्ये दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर तिने शासकीय पॉलिटेक्निक (जळगाव) येथे माहिती तंत्रज्ञान शाखेत पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. गुणवत्तेच्या आधाावर तिला शिक्षण शुल्क सवलत योजनेअंतर्गत प्रवेश मिळाला होता. त्यानंतर तिने पुणे येथील सिंहगड अभियांत्रिकी संस्थेत माहिती तंत्रज्ञान शाखेत अभियांत्रिकी पदवी मिळवली. संपूर्ण शिक्षण शिष्यवृत्तीच्या माध्यमातून पूर्ण झाले. पदवीदरम्यान नोकरीची संधी मिळूनही तिने उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याचा निर्णय घेतला. तिने इंग्लंडमधील लीड्स विद्यापीठात ‘डेटा सायन्स आणि विश्लेषण’ या विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला. हे विद्यापीठ जगातील अग्रगण्य शंभर विद्यापीठांपैकी एक आहे. तेथे तिला भारतीय उत्कृष्ट शिष्यवृत्ती मिळाली. पदव्युत्तर शिक्षणादरम्यान तिने युनायटेड किंगडममधील स्वयंसेवी संस्थांच्या टिकाव क्षमतेवर आधारित प्रबंध सादर केला. ऑक्सफर्ड विद्यापीठ येथे झालेल्या डेटा परिषदेत या प्रकल्पाचे सादरीकरण करण्याची तीला संधी लाभली.

**नातेवाईक, कुटुंबाची मोलाची साथ**

वैष्णवी लहान असताना तिच्या वडिलांचे निधन झाले. तिच्या आईने तीला शिक्षणासाठी कुइलीही कमतरता भासू दिली नाही. एकट्याने सर्व कुटुंबही सांभाळले. वैष्णवीच्या यशात तिच्या नातेवाइकांचा आणि कुटुंबीयांचा मोलाचे सहकार्य लाभले आहे. जिद्द, सातत्य आणि योग्य मार्गदर्शन असल्यास कोणतीही परिस्थिती आपल्या यशात अडथळा ठरत नाही, हे वैष्णवी पाटील वाटचालीतून स्पष्ट होते.

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

‘चमकण्याची’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले

महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!

डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

**जाहिरात बुकिंगसाठी संपर्क**
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# गुरु गोविंदसिंहजी : धर्म, धैर्य आणि मानवतेचा अमर संदेश

**जयंती विशेष**



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शीख धर्माचे दहावे आणि अखेरचे गुरू, श्री गुरू गोविंदसिंहजी महाराज यांची जयंती संपूर्ण देशभरात तसेच जगभरातील शीख बांधवांकडून अत्यंत श्रद्धा, उत्साह आणि अभिमानाने सर्वत्र तिथीनुसार २७ डिसेंबर रोजी साजरी केली जाते. अन्यायाविरुद्ध संघर्ष, धर्मरक्षण, समानता आणि मानवतेसाठी त्यांनी दिलेले बलिदान भारतीय इतिहासात अजरामर आहे.

### जन्म आणि बालपण

गुरू गोविंदसिंहजी यांचा जन्म २२ डिसेंबर १६६६ रोजी (पौष शुक्ल सप्तमी) पाटणा साहिब (आजचे बिहार) येथे झाला. त्यांचे बालपणीचे नाव गोविंद राय होते. ते नववे शीख गुरू श्री गुरू तेगबहादूरजी महाराज आणि माता गुजरी माता यांचे पुत्र होते. लहान वयापासूनच त्यांच्यात विलक्षण बुद्धिमत्ता, धैर्य आणि नेतृत्वगुण दिसून येत होते.

### गुरुपदाची जबाबदारी

इसवी सन १६७५ मध्ये औरंगजेबाच्या अत्याचारांविरोधात धर्मरक्षणासाठी गुरू तेगबहादूरजींनी हौतात्म्य पत्करले. त्यानंतर अवघ्या नऊव्या वर्षी गोविंद राय यांनी गुरूपद स्वीकारले. त्या काळात धार्मिक अत्याचार, जबरदस्तीने धर्मांतर आणि सामाजिक अन्याय मोठ्या प्रमाणात सुरू होता. गुरू गोविंदसिंहजींनी याला ठामपणे विरोध केला.

### खालसा पंथाची स्थापना

शीख इतिहासातील सर्वांत क्रांतिकारी घटना म्हणजे इसवी सन १६९९ मध्ये बैसाखीच्या दिवशी खालसा पंथाची स्थापना. त्यांनी ‘ पाच प्यारे ’ निवडून शीखांना एक नवे ओळखचिन्ह दिले.

खालसा पंथाचा संदेश स्पष्ट होता

धर्मासाठी शस्त्र धरणे हे पाप नसून कर्तव्य आहे.

### खालसाला त्यांनी खालील पाच ककार दिले.

केश
कंगवा
कडा
कच्छा
कृपाण

यातून शिस्त, शौर्य, स्वाभिमान आणि आत्मसंरक्षणाचा संदेश दिला.

### त्याग आणि बलिदान

गुरू गोविंदसिंहजींचे संपूर्ण जीवन संघर्षाने भरलेले होते. त्यांचे चार पुत्र (साहिबजादे) धर्मरक्षणासाठी हौतात्म्य पावले. दोन पुत्र युद्धात वीरगतीला प्राप्त झाले. दोन लहान पुत्रांना जीवंत भिंतीत चिणण्यात आले. तरीही गुरुजींच्या मनात कधीही द्वेष नव्हता. त्यांनी नेहमीच सत्य, न्याय आणि करुणेचा मार्ग दाखविला.

### साहित्य आणि आध्यात्मिक योगदान

गुरु गोविंदसिंहजी हे थोर योद्धे तर होतेच, पण ते महान कवी, तत्त्वज्ञ आणि विचारवंत देखील होते.

### त्यांच्या प्रमुख रचनांमध्ये :

दसम ग्रंथ
जाप साहिब
चौपई साहिब

या रचनांतून आत्मविश्वास, निर्भयता आणि ईश्वरभक्तीचा संदेश मिळतो.

### गुरू ग्रंथ साहिबांना अंतिम गुरू घोषित

गुरू गोविंदसिंहजींनी सिख परंपरेला नवा दिशा देत गुरू ग्रंथ साहिबांना शीखांचा अंतिम गुरू घोषित केले. यामुळे मानवी गुरू परंपरेचा अंत झाला आणि ग्रंथरूप गुरूची संकल्पना प्रस्थापित झाली.

आजच्या काळातील संदेश गुरू गोविंदसिंहजींचे जीवन आजच्या समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

### गुरू गोविंदसिंहजींचा संदेश

अन्यायाविरुद्ध उभे राहा.
धर्म, जात, लिंग यावर आधारित भेदभाव नको.
आत्मसन्मान आणि साहस जपा.
मानवता सर्वांत श्रेष्ठ.

गुरू गोविंदसिंहजी जयंती हा केवळ धार्मिक उत्सव नसून शौर्य, बलिदान आणि मानवतेच्या मूल्यांची आठवण करून देणारा दिवस आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे आणि तो पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल.

# हनुमानजी को चिरंजीवी क्यो कहते हैं?



हनुमानजी को आठ चिरंजीवियों (अमर जीवों) में से एक माना जाता है। ब्रह्मांड में आठ ऐसे महान भक्त और योद्धा हैं जो कलियुग तक जीवित हैं और पृथ्वी पर विचरण करते हैं। ये अष्ट चिरंजीवी हैं ।

१) अश्वत्थामा
२) महाबली (बली)
३) वेद व्यास
४) हनुमान
५) विभीषण
६) कृपाचार्य
७) परशुराम
८) मार्कण्डेय (या कभी-कभी क्रौंच मुनि का नाम भी लिया जाता है)

हनुमानजी के चिरंजीवी होने का सबसे प्रमुख प्रमाण रामायण के युद्धकांड में मिलता है। जब श्रीराम अपनी लीला समाप्त कर वैकुण्ठ जाने लगे, तो हनुमानजी ने उनसे विनय की कि वे उन्हें भी साथ ले चलें। तब भगवान राम ने कहा-

**‘ तव प्रभावं बलं वीर्यं न कश्चिद् वेत्ति राघव।**
**यावद् रामकथा विश्वे प्रचरिष्यति तावत् त्वं जीव।।’**

**अर्थात :** ‘ हे वीर! तेरे प्रभाव, बल और पराक्रम को कोई नहीं जानता। जब तक इस संसार में रामकथा प्रचरित होती रहेगी, तब तक तुम जीवित रहोगे।’

इसके अलावा तुलसीदासजी ने हनुमान चालीसा में भी लिखा है-

**‘ संकट मोचन हनुमान की जय।**
**चिरंजीवी हनुमान की जय। ’**

और एक दोहा बहुत प्रसिद्ध है-

**‘ जगि अमर पद पावै जाई,**
**जब तक सूरज चाँद रहे, तब तक हनुमत वीर रहें।**
**रामकथा के प्रसंग में, हनुमान रहे नित संग में। ’**

इसलिए सभी रामभक्त और सनातन ग्रंथ एक स्वर से मानते हैं कि हनुमानजी आज भी जीवित हैं, पर्वतों-वन में तप करते हैं, और जहाँ कहीं भी रामकथा या रामनाम का सत्संग होता है, वहाँ अदृश्य रूप में उपस्थित रहते हैं।

इसलिए जब भी हम हनुमान चालीसा पढ़ते हैं, अंत में बोलते हैं-

**‘ संकट मोचन हनुमान की जय।**
**चिरंजीवी मारुति नंदन की जय। ’**

**जय सियाराम! जय हनुमान!**

# २०२५ च्या शेवटी ‘ या ’ राशींचे नशीब चमकलेच समजा

## लक्ष्मी-नारायण राजयोगामुळे होणार अनपेक्षित धनलाभ...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैदिक ज्योतिषशास्त्रानुसार २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात अनेक राजयोग आणि शुभ योग तयार होणार आहेत. यामध्ये लक्ष्मी-नारायण राजयोगाचा समावेश आहे. लक्ष्मी-नारायण राजयोग व्यवसायाचा कर्ता बुध आणि धनाचा कर्ता शुक्र यांच्या युतीने तयार होईल. सध्या शुक्र धनू राशीत भ्रमण करत आहे. २९ डिसेंबर रोजी बुद्धीचा कर्ता बुध देखील धनू राशीत प्रवेश करेल. अशा परिस्थितीत लक्ष्मी-नारायण राजयोगाची निर्मिती काही राशींचे भाग्य उजळवू शकते. याव्यतिरिक्त उत्पन्नात वाढ होण्यासोबतच नवीन नोकरी मिळण्याची शक्यता आहे. तर मग जाणून घेऊया कोणत्या भाग्यवान राशी आहेत.

### वृश्चिक राशी



लक्ष्मी-नारायण राजयोगाची निर्मिती फायदेशीर ठरू शकते. हा राजयोग राशीच्या धनस्थानात तयार होईल. त्यामुळे या काळात वेळोवेळी अनपेक्षित आर्थिक लाभ मिळू शकतात. तसेच व्यावसायिक आदर आणि करिअरमध्ये यश निश्चित होईल. या काळात आर्थिक लाभाचे नवीन मार्ग खुले होतील. नातेसंबंधांमध्ये सुसंवाद वाढेल. कुटुंबात आनंद निर्माण होईल. तुमच्या बोलण्याचा प्रभावही वाढेल. त्यामुळे लोक प्रभावित होतील. शिवाय यादरम्यान तुमच्या इच्छा पूर्ण होतील.

### कन्या राशी



लक्ष्मी-नारायण राजयोगाची निर्मिती कन्या राशीच्या लोकांसाठी शुभ ठरू शकते. हा राजयोग तुमच्या गोचर कुंडलीच्या चौथ्या घरात होत आहे. त्यामुळे या काळात तुम्हाला भौतिक सुखसोयींचा अनुभव येईल. नोकरी आणि व्यवसायातही प्रगती होण्याची शक्यता आहे. या काळात आदर आणि प्रतिष्ठा वाढेल. तुम्हाला जुन्या कर्जातूनही सुटका मिळेल. आध्यात्मिक विचारांसोबतच भौतिक सुखसोयी वाढतील. या काळात वाहन किंवा मालमत्ता देखील मिळू शकेल. वडिलोपार्जित संपत्तीचा वारा मिळू शकेल.

### मेष राशी



लक्ष्मी-नारायण राजयोगाची निर्मिती फायदेशीर ठरू शकते. हा राजयोग राशीच्या नवव्या घरात रचला जाईल. त्यामुळे या काळात नशीब सोबत राहील. कामासाठी किंवा व्यवसायासाठी प्रवास देखील करू शकता. व्यवसायात नवीन ग्राहक, चांगले सौदे आणि नफा अपेक्षित आहे. या काळात विद्यार्थ्यांना अभ्यासावर लक्ष केंद्रित करून चांगले परिणाम मिळण्याची शक्यता आहे. एखाद्या धार्मिक किंवा शुभ कार्यक्रमात देखील सहभागी होऊ शकता.

## शनिवार : न्याय, शांती आणि कृपेचा दिवस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



शनिवारी शनी देवाची उपासना केल्याने मनातील नकारात्मकता दूर होते. जीवनात शांती, स्थैर्य व कर्मफलाचे योग्य फळ मिळते. शनी देव भक्तांचे रक्षण करतात आणि अन्याय करणाऱ्यांना योग्य मार्ग दाखवितात.

**आजचा दिव्य संदेश**

प्रामाणिक कर्म करा. शनी देव त्याचे फल नक्की देतात.
तीळ तेलाचा दिवा लावा. मन शांत होईल.


गरिबांना अन्न किंवा काळ्या वस्त्रांचे दान करा.
शनी स्तोत्र, शनी चालिसा व ‘**ॐ शं शनैश्चराय नमः**’ जपा.

**भक्तिमय विचार**

‘ कर्म चांगले असेल, तर शनी देवाची कृपा सदैव तुमच्यासोबत असते. ’

# माँ चामुंडा रावणाच्या लंकेची रक्षा करत होत्या...

## मग हनुमानजींनी लंका दहन कसे केले?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रावण हा अत्यंत बुद्धिमान, विद्वान, पराक्रमी आणि ज्ञानी होता. चारही वेद आणि शास्त्रांचे सखोल ज्ञान रावणाला होते. भगवान शंकराचा परम भक्त तर होताच शिवाय शिव तांडव स्तोत्राची रचना रावणाने केली होती. रामायणात वर्णन केलेली रावणाची लंका सोन्याची नगरी तर होतीच त्याचबरोबर अनेक देवता आणि दैवी शक्तींचा निवास तेथे होता. या शक्तींमध्ये माँ चामुंडाही होत्या. त्यांना महाकालीचे उग्र रूप मानले जाते. सामान्यतः माँ चामुंडा राक्षसांचा संहार करणाऱ्या देवी म्हणून ओळखल्या जातात. मात्र रावणाचे सामर्थ्य यावरूनच स्पष्ट होते, की त्यानेच माँ चामुंडांना लंकेच्या रक्षणासाठी प्रस्थापित केले होते. बाह्य आक्रमणांपासून आणि दैवी शक्तींमुळे होणाऱ्या संकटांपासून लंकेच संरक्षण करण्याचे कार्य साक्षात माँ चामुंडा करत होत्या. पण जर माँ चामुंडा लंकेचे संरक्षण करत होत्या, तर हनुमानजी लंकेत कसे प्रवेश करू शकले? लंकेला आग कशी लावू शकले? चला, हनुमानजी आणि माँ चामुंडा यांच्या भेटीची कथा जाणून घेऊ.

### लंका आणि माँ चामुंडा यांचे रहस्यमय नाते

लोकपरंपरांनुसार लंका केवळ सोन्याची नगर नव्हती, तर ते एक अत्यंत शक्तिशाली तांत्रिक केंद्र देखील होते. रावण स्वतः महाविद्वान, महान शिवभक्त आणि उच्च कोटीचा तांत्रिक होता. असे मानले जाते, की रावणाने आपल्या कठोर साधनांद्वारे अनेक उग्र देवतांना लंकेच्या रक्षणासाठी प्रसन्न केले होते. ज्यामुध्ये माँ चामुंडांचाही समावेश होता. जोपर्यंत माँ चामुंडा लंकेची रक्षा करत होत्या तोपर्यंत लंका अभेद्य मानली जात होती.

### हनुमानजींचा लंकेत प्रवेश

जेव्हा प्रभू श्रीरामचंद्र यांचे दूत म्हणून हनुमानजी लंकेत प्रवेश केला होता तेव्हा सीता मातेच्या शोधात प्रत्येक स्थळी ते गेले. त्यांनी केवळ रावणाची नगरी पाहिली नाही, तर तेथे विद्यमान असलेल्या दैवी आणि तांत्रिक शक्तींचाही अनुभव घेतला. हनुमानजींचे तेज आणि दैवी सामर्थ्य पाहून लंकेची रक्षा करणाऱ्या शक्तीही अचंबित झाल्या. असे सांगितले जाते, की जेव्हा माँ चामुंडांनी हनुमानजींना पाहिले तेव्हा सुरूवातीला त्यांना हनुमानजी एक सर्वसाधारण वानर आहेत, असे वाटले. दरम्यान लंकेची रक्षा करणे हे आपले कर्तव्य असल्याने माँ चामुंडांनी हनुमानजींना अडविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा हनुमानजींनी स्वतःची ओळख करून दिली, की ते प्रभू श्रीराम यांचे दूत असून, सीता मातेच्या शोधासाठी आले आहेत. हे ऐकताच माँ चामुंडांना समजले, की त्यांच्यासमोर उभा असणारा दूत अधर्माच्या विनाशासाठी आणि धर्माच्या स्थापनेसाठी आला आहे.

### माँ चामुंडांनी लंका का सोडली?

माँ चामुंडा या स्मशानाच्या अधिष्ठात्री, तांत्रिक शक्तींच्या देवी आणि अधर्माचा संहार करणाऱ्या देवी मानल्या जातात. माँ चामुंडा म्हणजे धर्माची शक्ती आहेत असेही म्हटले जाते. त्या केवळ अशा ठिकाणी निवास करतात जेथे धर्माची रक्षा होते. जेव्हा त्यांना कळले, की रावणाने सीता मातेचे अपहरण केले आहे. तेव्हा लंकेची रक्षा करणे हे धर्माच्या विरोधात आहे, असे त्यांनी मानले. हनुमानजींचा उद्देश समजल्यावर माँ चामुंडांनी लंकेच्या रक्षणाची जबाबदारी सोडली आणि त्या तेथून गेल्या. माँ चामुंडांच्या प्रस्थानासोबतच लंकेची अदृश्य रक्षा समाप्त झाली आणि तांत्रिक कवच तुटू लागले. त्यानंतर हनुमानजींनी लंका दहन करणे शक्य झाले. या कथेवरून एक गोष्ट स्पष्ट होते, की दैवी शक्ती नेहमी धर्माचीच रक्षा करतात, अधर्माची नाही.




(वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे.)